# तिसरे पान

यंदा मी ठरवले कि आपण फुले, भाज्या ह्यांचे बियाणे आणून स्वतःच रोपटी तयार करूया. मग गेले बाजारात आणि मल्च पॉट, भाज्या आणि फुले ह्यांचे बियाणे, माती खरेदी करून आले. दुसरे दिवशी मी माती मल्च पॉट मध्ये भरून बी लावून वर पुन्हा थोडी माती घालून पॉट तयार केली नि थोडे पाणी शिंपून आता निसर्गाच्या चातुर्याची वाट पाहत बसले. कुणाला अंकुर लवकर फुटणार होता तर कुणाला उशीर लागणार होता.

मी आपली सकाळी उठले कि रोज ह्या माझ्या नव्या पाहुण्यांची पाहणी करायला जायची. आठ ते दहा दिवस गेले नि मग हलकेच दोन इटकुली बिटकुली चिमणी पाने डोके काढून मला हाय करू लागली आणि माझा आनंद काय सांगू? मी खुश झाले. मग वाट पाहत बसले कारण आता तर टोमॅटो, काकडी, वांगी, झिनिया सगळ्यांचीच पाने अगदी सारखीच दिसत होती. मी मनात म्हटले, ही वेगळी वेगळी ओळखू कशी येणार? पण आणखी तीन ते चार दिवसांनी आणखी एकेक पान प्रत्येकाला फुटू लागले. हे तिसरे पान आपल्या आपल्या कुटुंबाची ओळख देऊ लागले. टोमॅटोचे पान म्हणे मी आहे टोमॅटो कुटुंबातला. तर वांग्याचं पान म्हणे मी आहे वांगी कुटुंबातला. अशी प्रत्येक जण आपली ओळख देऊ लागला. ती हलके हलके वाढू लागली.

मी त्यांना खते पण देऊ लागले नि ती जोम धरू लागली. फुले आली मग फळे धरू लागली. माझा आनंद तर खूप वाढू लागला. फुले घरात कुठे ठेवायची कि कुणाला भेट द्यायची याचा मी विचार करू लागले, नि मग टोमॅटोला हिरवे टोमॅटो लागले कि आता हिरव्या टोमॅटोची चटणी करूया, भजी पण तळूया अशी स्वप्ने मी आकारू लागले. थोडा टोमॅटोचा मुरंबा आणि नारळ टोमॅटो वड्या करायचे मनात ठरवले.

गंमत म्हणून लावलेल्या उलट्या टोमॅटोला टोमॅटो धरू लागले नि मी आनंदले. माझी एक मैत्रीण आहे, तिला असे बी लावून घरी प्लांट करता येते हे माहीतच नव्हते. तिला मी म्हटले, "अगं असे बी लावून ते मातीत रुजवून येणारे प्लांट हे  नर्सरीतल्या प्लांटपेक्षा कितीतरी जास्त आनंद देते. कारण त्याला आपण लावलं, त्याची प्रगती आपण पाहतोय, त्याला खत घालतोय आणि दहा-बारा दिवसांनी दोन पानांतून आपला वेगळेपणा दाखवत तिसरे पान येतेय आपल्या कुटुंबाची ओळख दाखवायला."

**सौ. आशा राजाराम जोशी**
**ओकीमस (मिशिगन)**